# स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ फक्त कागदावरच

## मेळघाटातील आरोग्य विभागाचे तीनतेरा

## रुग्णांच्या कंठाशी प्राण मात्र अडचणीत





मारोती पाटणकर

**चुरणी, (दि. 30)**- मेळघाट हा आदिवासी बहुल व डोंगराळ दुर्गम भाग आहे, या भागात आरोग्य सेवा नेहमीच अपुऱ्या साधनसामग्रीवर अवलंबून राहिलेली आहे. ग्रामीण रुग्णालये उभारली असली तरी त्याठिकाणी मूलभूत सोयी सुविधांचा मोठ्या प्रमाणावर अभाव आहे. मेळघाटातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयांमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ व बालरोग तज्ज्ञांची नेमणूक दाखवली जाते, मात्र हे डॉक्टर प्रत्यक्षात हजर नसतात. कागदावर उपस्थित राहणाऱ्या या डॉक्टरांमूळे रुग्णांचे प्राण कंठाशी येताना दिसत आहे.

### दर्जेदार आरोग्य यंत्रणेच्या नावावर दर्जाहिन प्रकार

मेळघाटातील गरोदर माता, कुपोषित किंवा नवजात बालकांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शात दर्जेदार उपचार मिळावा याकरिता आरोग्य विभागाने दरमहिन्याला एका तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती सदरच्या आरोग्य केंद्रात करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र एका महिन्याची जॉईनिंग दाखवून या तज्ज्ञ डॉक्टरांचे नाव रुग्णालयाच्या नोंदीत दिसते, मात्र प्रत्यक्षात ते रुग्णसेवेसाठी उपस्थित राहत नाहीत. त्यामुळे गरोदर महिलांना व लहान मुलांना आवश्यक तज्ज्ञ सेवा मिळत नाही. मेळघाटात गरोदर मातांची संख्या लक्षणीय आहे. प्रसुतीदरम्यान गंभीर अडचणी उद्भवल्यास त्वरित स्त्रीरोगतज्ज्ञाची गरज भासते पण रुग्णालयात तज्ज्ञ उपलब्ध नसल्याने मातामृत्यूचे प्रमाण वाढण्याची भीती निर्माण झाली आहे.

### महिन्याला दोन मातामृत्यू

वेळीच उपचार मिळत नसल्याने मेळघाटात कधी कधी महिन्याला दोन मातामृत्यू झाल्याच्या घटना समोर येतात. नुकतीच चिखलदरा तालुक्यातील सरवारखेडा येथील रहिवासी वनिता गजा धिकार (वय 22 ) या गरोदर महिलेचा 28 सप्टेंबर योग्य उपचाराअभावी मृत्यू झाला. त्या अगोदर 18 सप्टेंबर रोजी चिखलदरा तालुक्यातीलच पाचडोंगरी येथील राणी प्रेम सावलकर (वय 22) या महिलेचा प्रसूती दरम्यान मृत्यू झाला होता.

### कसे कमी होतील बालमृत्यू

बालकांची संख्या या भागात जास्त आहे. ग्रामीण व डोंगराळ भागातील लहान मुलांना कुपोषणासह, हंगामी संसर्गजन्य आजार याचा मोठा प्रभाव असतो. अशा वेळी बालरोगतज्ज्ञ नसल्यानं योग्य निदान व उपचार वेळेत मिळणे कठीण जाते. अनेकदा बालमृत्यूची प्रकरणे नोंदली जात असून त्यास जबाबदार कोण? हा प्रश्न स्थानिक नागरिक करीत आहे. ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सेवक यांच्यावर 40 ते 50 गावांचा प्रचंड भार आहे. वैद्यकीय डॉक्टरकडे सर्वच जबाबदाऱ्या असल्याने रुग्णांना दर्जेदार सेवा मिळत नाही. तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्णांना अचलपूर किंवा अमरावती येथे रेफर करावे लागते. डोंगराळ भागातील रुग्णांना रुग्णालयापर्यंत पोहोचवणे हेच मोठे आव्हान ठरते. वाहतुकीची साधने उपलब्ध नसल्याने अनेकदा जीव धोक्यात घालून रुग्णांना उशिरा उपचार मिळतो.

# जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र

## पालकमंत्र्यांच्या भूमिकेवर मात्र प्रश्नचिन्ह



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.30)** - जिल्ह्यात सलग पावसामुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून, बँक व खासगी वित्तसंस्थांच्या नोटिसांनी शेतकरी हताश होत आहेत. या पार्श्वभूमीवर अवघ्या 24 तासांत तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. असे असताना जिल्ह्याचे पालक असलेल्या मंत्र्यांची शेतकऱ्यांकडे पाठ फिरविण्याच्या भूमिकेवर संताप व्यक्त केला जात आहे.

दर्यापूर तालुक्यातील बोराळा येथील पुरुषोत्तम सहादेवराव तायडे (45) यांनी मायक्रो फायनान्स कंपनीचे कर्ज व पिकांचे नुकसान या कारणांमुळे विष प्राशन करून जीवन संपवले. त्यांच्या मागे पत्नी व तीन लहान मुले आहेत. लेहगाव रेल्वे येथील श्रीधर प्रल्हाद कोल्हे (50) यांनी देखील आत्महत्येचा मार्ग निवडला, तर तिवसा तालुक्यातील शिरजगाव मोझरी येथील मोहन हनुमंत वाघ (45) यांनी जीवन संपवले.

शेतकरी बांधावर प्रत्यक्ष जाणे टाळणाऱ्या अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री व महसूल मंत्र्यांबद्दल नाराजी वाढली आहे. मंत्री जिल्ह्यात येतात, बैठकाही घेतात; पण शेतकऱ्यांचे दु:ख प्रत्यक्ष पाहण्यास बांधावर जात नाहीत, अशी खंत शेतकऱ्यांतून व्यक्त होते.

दुसरीकडे बडनेरा मतदारसंघाचे आमदार रवी राणा मात्र भर पावसात शेतकऱ्यांच्या बांधावर उपस्थित राहून त्यांचे हालअपेष्टा जाणून घेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या वेदना पालकमंत्र्यांना दिसत नाहीत का, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

### शेतकऱ्यांची वज्रमुठ गरजेची

शेतकऱ्यांना दिलेली अनेक वचने शासनाकडून पाळली जात नाहीत. आंदोलने करूनही परिणाम मर्यादित राहतात. शेतकरी जर एकत्र आले, तरच त्यांच्या मागण्या मान्य होऊ शकतील, असा संदेश या घटनांनी पुन्हा अधोरेखित केला आहे.

# प्रहार जनशक्ती पक्षात शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश

- चिखलदरा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रहार पक्षाची एन्ट्री
- दोन माजी नगराध्यक्ष व सहा माजी नगरसेवक झाले प्रहारी





महासागर | प्रतिनिधी

**चिखलदरा, (दि. 30)**- सामान्य माणसाचा पक्ष, हक्कांसाठी लढणारा पक्ष ङ्क प्रहार जनशक्ती पक्ष या घोषणांनी कार्यकर्ता प्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. चिखलदरा येथे प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात तालुक्यातील शेकडो युवक-युवती, महिला व समाजातील विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांनी प्रहार जनशक्ती पक्षात प्रवेश केला.

या सोहळ्यात माजी नगराध्यक्ष सतीश गौर, गीता जामकर, माजी नगरसेवक अन्वर हुसैन, नगरसेवक राजू भालेराव, कल्पना खाडे, पंचायत समिती उपसभापती मुन्ना बैठेकर, टेंब्रुसोंडा सरपंच शैलेंद्र गावंडे, नरेंद्र टाले, संजु अलोकार, विद्रोही संस्था अध्यक्ष शुभम कच्छवा, उपाध्यक्ष धर्मपाल गायकवाड, व्यापारी संघटना उपाध्यक्ष फारुक अली, विद्रोही संघटना प्रतिनिधी रामकिशन कास्देकर, सचिन गोराले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महिला आघाडीतून दीपमाला चौहान, सोनम घोरे, मोहिनी महत्तम, पूजा तिवारी, वैष्णवी सिंधन, सारिका चौधरी, सुवर्णा चिखलकर, शबनम परवीन मतीन खान, कुसूम गाडे, सविता शेकोकर, वर्षा काटोले, आसियान सिराजदीन शेख, दीपा श्रीवास, माया पतिंगे, माला जगदेव, सुषमा पळसपागर, गीताबाई सावलकर, सुमन कासदेकर, पूनम लादे, माला लादे, प्रगती धुर्वे, जयंमाला पाटोरकर आदींनी सहभाग घेतला. आमच्या हक्कांसाठी लढायचं, अन्यायाविरुद्ध आवाज उठवायचा तर फक्त प्रहारच हा खरा पर्याय आहे असा निर्धार व्यक्त केला. पक्ष पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रहार म्हणजे जनतेचा आवाज, अन्यायाविरुद्धचे बंड. नव्या रक्ताच्या सहभागामुळे पक्षाची ताकद अनेक पटींनी वाढेल. प्रवेश घेतलेल्या कार्यकर्त्यांमुळे प्रहार जनशक्ती पक्ष आगामी निवडणुकांमध्ये आणखी भक्कम होईल, असा ठाम विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### चिखलदरा वास्तवात राज्याचे कश्मीर व्हावे!

बच्चू कडू म्हणाले, मी आमदार असताना शासकीय योजना सामान्य माणसापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, मात्र शासनाची भूमिका चुकीची आहे. महाराष्ट्रात अत्यल्प नुकसान भरपाई दिली जात असताना पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणात भरपाई देण्यात आली. चिखलदरा हे राज्याचे 'कश्मीर'म्हणून ओळखले जावे, स्थानिकांना रोजगार मिळावा यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. स्कायवॉकसारख्या प्रकल्पांमुळे चिखलदराचा चेहरामोहरा बदलू शकतो.

# आदिवासी बांधवांच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य- तहसीलदार

## सेवा पंधरवड्यानिमित्त विविध उपक्रम

**चुरणी, (दि.30)** - मेळघाटातील गोरगरीब जनतेच्या समस्यांचे निराकरण करुन त्यांना न्याय देण्याला आम्ही प्रथम प्राधान्य देत आहे. मेळघाटमध्ये याकरिताच सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यत आले. या माध्यमातून विविध सेवा व योजना सामान्य गोरगरीब जनतेपर्यंत पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असे चिखलदऱ्याचे तहसीलदार जीवन मोराणकर यांनी सांगितले.

तहसीलदार मोराणकर यांनी सांगितले की, मेळघाटातील सामान्य माणसाला न्याय मिळावा यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. तालुक्यातील शेवटच्या गावापर्यंत सेवा व योजना पोहोचविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गोरगरीब जनतेला घरकुल, विविध दाखले आणि शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी अधिकारी व कर्मचारी तत्पर असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतांच्या पाणंद रस्त्यांचा प्रश्न सोडविण्यासोबतच गरीबांच्या घरांचा तसेच अतिक्रमणधारकांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी काम सुरू आहे. 2011 पूर्वीचे अतिक्रमण कायम करण्याचा शासनाचा नियम असून त्यानुसार पात्रांना घरकुलाचा लाभ आणि पट्टे देण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. काही गावांमध्ये स्मशानभूमी नसल्याने तेथे जागा उपलब्ध करून प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणार असल्याचे तहसीलदारांनी सांगितले. भविष्यात गावागावात स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न होईल.



सेवा पंधरवड्यात तालुक्यातील हतरू, सोमवारखेडा, चुरणी, चिखलदरा, ढाकणा, सती आणि रुईफाटा येथे कॅम्प घेण्यात आले. या कॅम्पमध्ये तपासणी, विविध दाखले वाटप तसेच विभागीय योजनांची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे मेळघाटातील आदिवासी व गोरगरीब जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. चिखलदरा तालुक्यातीत सुमारे 800 पाणंद रस्त्यांचे नियोजन आहे. सेवा पंधरवड्यात काही रस्त्यांचा प्रश्न निकाली निघाला असून उर्वरित रस्ते करण्याचा प्रयत्न आहे. नावीण्यपूर्ण योजनेत गावात स्मशानभूमी निर्माण करण्याचा संकल्प असून त्यादृष्टीने कारवाई सुरू आहे.

**जीवन मोराणकर**
**तहसीलदार, चिखलदरा.**

# पोटे पाटील एज्यु. ग्रुपची पंजाबच्या पूरग्रस्तांना मदत

## पाच लाखांची देणगी दिली

**अमरावती, (दि. 30)** समाजसेवा आणि मदतीचा वारसा पुढे चालवत पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे उपाध्यक्ष श्रेयश पोटे पाटील आणि त्यांच्या कुटुंबाच्या वतीने पंजाबमधील पूरग्रस्त नागरिकांसाठी पाच लाख रुपयांची देणगी अर्पण करण्यात आली.

अमरावती येथील गुरुद्वारा श्री गुरु सिंह सभेला भेट देऊन श्रेयश पोटे पाटील यांनी कुटुंबाच्या वतीने ही देणगी सुपूर्त केली. या प्रसंगी प्रकाश पुंड उपस्थित होते. गुरुद्वारा सभेचे अध्यक्ष अमरज्योतसिंग जग्गी यांनी पोटे कुटुंबाची सामाजिक बांधिलकी अधोरेखित करताना सांगितले की, पोटे कुटुंब नेहमी संकटाच्या काळात समाजासाठी पुढे येते. सचिव डॉ. निक्कू खालसा यांनी आभार मानताना हे योगदान पूरग्रस्तांना मोठा दिलासा देणार असल्याचे नमूद केले. पंजाबमधील विनाशकारी पुरामुळे हजारो कुटुंबे संकटात सापडली आहेत. अनेकांचे घर, शेती आणि उपजीविका उद्ध्वस्त झाली आहे. अशा परिस्थितीत पोटे कुटुंबाने केलेले योगदान हे मानवतेचे अनोखे उदाहरण असल्याचे गुरुद्वारा व्यवस्थापन समितीने सांगितले. हे योगदान सरबत दा भला म्हणजेच सर्वांचे कल्याण या शीख परंपरेचे प्रत्यक्ष उदाहरण ठरले आहे.



गुरुद्वारा समितीने सांगितले की, पोटे कुटुंबाच्या या मदतीमुळे शेकडो कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. समाजसेवा, शिक्षण आणि मदतीच्या कार्यात पोटे कुटुंबाचा सहभाग नेहमीच लक्षणीय राहिला आहे. अमरावतीतील अनेक उपक्रमांद्वारे त्यांनी गोरगरिबांना आधार दिला असून पंजाबमधील या योगदानामुळे त्यांची सामाजिक बांधिलकी आणखी अधोरेखित झाली आहे.या कार्यक्रमाला गुरुद्वारा समितीचे सचिव डॉ. निक्कू खालसा, खजिनदार रतन दीप सिंग बग्गा, रविंदर सिंग सलुजा, राजेंद्र सिंग सलुजा, प्रदीप चड्डा, सतपाल सिंग बग्गा, गुरविंदर सिंग, अमरजीत सिंग बेदी, रोहित खुराना, रबजीत सिंग सेठी, वकील सिंग, सुमित सिंग, संजय कडू यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी या योगदानाचे मनापासून कौतुक केले.

# प्राविण्य प्राप्त खुशी आमोदेचा सत्कार

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, (दि. 30)** - गावातीलच नव्हे तर संपूर्ण परिसरातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरलेली खुशी आमोदे हिने दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाचा गौरव करण्यासाठी श्री शिवाजी दुर्गा मंडळ, वरुड तर्फे तिचा दिमाखदार सत्कार करण्यात आला.

खुशी ही बाळासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय, जरूड येथील विद्यार्थिनी असून ती तालुक्यातील पांढरघाटी येथील रहिवासी आहे, तिने अभ्यासात सातत्य, मेहनत व चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवले. तिच्या उज्ज्वल यशाने शाळा, शिक्षक, पालक तसेच गावकऱ्यांचा अभिमान वाढविला आहे.

रविवारी (दि. 28 सप्टेंबर) दुपारी बारा वाजता शिवाजीनगर, वरुड येथे झालेल्या या सत्कार समारंभाला परिसरातील नागरिक, मान्यवर, पालक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. मंडळाचे पदाधिकारी व पाहुण्यांनी खुशीच्या गळ्यात मानाचा शाल, सन्मानचिन्ह व श्रीफळ देऊन गौरव केला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, गावातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. खुशी आमोदे ही त्याचे उत्तम उदाहरण आहे. सत्काराला प्रतिसाद देताना खुशी हिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक आणि सहाध्यायींना दिले. तसेच, भविष्यात आणखी शिक्षण घेऊन समाजाच्या सेवेसाठी योगदान देण्याची गाढ इच्छा व्यक्त केली.या कार्यक्रमामुळे शिवाजीनगर परिसरात उत्साहाचे वातावरण होते.



# आ. यावलकरांच्या हस्ते अपघातग्रस्त कुटुंबीयांना चार लक्षांचा धनादेश

महासागर | प्रतिनिधी


**हिवरखेड, (दि. 30) :** मोर्शी तालुक्यातील हिवरखेड येथे 8 जुलै रोजी रात्री झालेल्या दुर्दैवी घटनेत 3 वर्षीय बालकाचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेत घराची शिकस्त भिंत अंगावर कोसळल्याने बालक जागीच ठार झाला होता तर त्याची आजी गंभीर जखमी झाली होती. या अपघातग्रस्त कुटुंबीयांना आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांच्या प्रयत्नातून शासनातर्फे चार लक्ष रुपयांचा विशेष सहाय्य निधीचा धनादेश देण्यात आला.

27 सप्टेंबर रोजी आ. यावलकर यांच्या हस्ते हा धनादेश बालकाच्या पालकांना सुपुर्त करण्यात आला. घटनेत मृत्यू झालेला प्रशांत गांजरे आपल्या आजी रेखा सुखदेवराव गांजरे यांच्यासोबत अवधूत मंदिरात जात असताना गावातील सुरेंद्र खेरडे यांच्या घराची भिंत कोसळून हा अपघात घडला होता. ढिगाऱ्याखाली दबल्याने बालकाचा मृत्यू झाला तर आजीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. तिच्यावर प्रथम मोर्शी येथील खाजगी रुग्णालयात व नंतर अमरावती येथे अडीच महिने उपचार सुरू होते. घटनेची माहिती मिळाल्यानंतर तत्कालीन प्रभारी तहसीलदार विनोद वानखडे व महसूल अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला होता. त्यानंतर अपघातग्रस्त कुटुंबाला तातडीने मदत मिळावी यासाठी आ. यावलकर यांनी पाठपुरावा केला. अखेर शासनाकडून मिळालेला हा सानुग्रह निधी देण्यात आला.



# ई-पीक पाहणी, फोटो आणि ॲग्रिस्टॅक क्रमांक बंधनकारक

## निकषात अडकणार राज्य सरकारची मदत







महासागर | बादल डकरे

**चांदूर बाजार, (दि. 30)** - अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, त्यांना कोणतेही निकष न लावता मदत दिली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकसानीच्या पाहणी दौऱ्यादरम्यान दिले होते. मात्र, प्रत्यक्षात पंचनामे करताना शेतकऱ्यांवर अनेक निकष लादले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य शासनाने नुकसानीच्या पंचनाम्यासाठी ई-पीक पाहणी, जीपीएससह नुकसानीचा फोटो, तसेच ॲग्रिस्टॅक क्रमांक बंधनकारक केल्यामुळे, या निकषात न बसणाऱ्या शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित राहावे लागू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

राज्यातील कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार, राज्यात एकूण 1 कोटी 69 लाख 22 हजार 967 हेक्टर पेरणी क्षेत्र असून, त्यातील केवळ 56 टक्के (94.72 लाख हेक्टर) क्षेत्राचीच ई-पीक पाहणी पूर्ण झाली आहे. म्हणजेच उर्वरित 44 टक्के क्षेत्र अजूनही ई-पीक पाहणीपासून वंचित आहे. राज्य सरकारने ई-पीक पाहणीसाठी 30 सप्टेंबर 2025 पर्यंत मुदत दिली असली तरी, या आधी पाहणी न झालेल्या शेतकऱ्यांना सरकारी मदत मिळेल की नाही, याबाबत मोठा संभ्रम आहे. सध्या पंचनामे ऑफलाइन पद्धतीने होत असून, अनेक ठिकाणी जीपीएस लोकेशनसह फोटो, त्यावरील अक्षांश-रेखांशाचे तपशील गोळा केले जात आहेत. गरजेनुसार या फोटोंना अहवालात समाविष्ट करण्यात येणार आहे.

### शेतकऱ्यांमध्ये नाराजी

अमरावती जिल्ह्यात नुकतीच अतिवृष्टीची पाहणी झाली असताना पालकमंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर गेलेच नाहीत, यामुळे त्यांच्याविषयी शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. आता स्थानिक आमदारांपैकी कोणाला तरी पालकमंत्री करावे, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

### आदेश नाही, फक्त आश्वासने

29 एप्रिल 2025 रोजी शासन निर्णयाद्वारे ॲग्रिस्टॅक क्रमांक बंधनकारक करण्याचे आदेश जाहीर करण्यात आले होते. मात्र मुख्यमंत्री आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी ॲग्रिस्टॅक क्रमांक नसला तरी मदत दिली जाईल असे सार्वजनिकरित्या जाहीर केले. मात्र अद्याप त्यासंदर्भात कोणताही शासन आदेश निघालेला नाही, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाची स्थिती आहे.

### आश्वासने सोपे, अंमलबजावणी कठीण

मुख्यमंत्री महसूल मंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडून कोणतेही निकष न लावता मदतीचे आश्वासन दिले असले तरी, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी, ॲग्रिस्टॅक क्रमांक आणि जीपीएस फोटो यांसारख्या अटींच्या चक्रव्यूहात अडकवले जात आहे. त्यामुळे खरीप हंगामात अतिवृष्टीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना खरोखरच सरकारची मदत मिळेल की नाही, याबाबत शंका उपस्थित होत आहे.

# रूपाली सोंडे यांची भाजपच्या जिल्हा महामंत्रीपदी निवड

महासागर | प्रतिनिधी



**वरुड, (दि. 30)**- तालुक्यातील भाजपच्या धडाडीच्या व एकनिष्ठ कार्यकर्त्या रूपाली इंद्रभूषण सोंडे यांची नुकत्याच जाहीर झालेल्या भाजपा महिला आघाडी अमरावती जिल्हा कार्यकारिणीत जिल्हा महामंत्री म्हणून निवड करण्यात आली आहे.

सोंडे यांनी यापूर्वी वरुड तालुका भाजपा महिला आघाडीच्या अध्यक्षा म्हणून कार्यभार सांभाळताना यशस्वी कार्यकाल पूर्ण केला. तळागाळातील लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी सतत झटत राहणे, विकासाच्या प्रश्नांवर वरिष्ठ नेत्यांपर्यंत पाठपुरावा करणे आणि पक्षवाढीसाठी एकनिष्ठतेने काम करणे या त्यांच्या कार्याची दखल घेऊन पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. जिल्हा महामंत्रीपदी झालेल्या त्यांच्या निवडीचे वरुड तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले आहे. या निमित्ताने रूपाली सोंडे यांनी आपल्या नियुक्तीसाठी आभार मानताना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार चंदू यावलकर, जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख तसेच महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्ष अनिता तिखीले यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त केले. वरुड तालुक्यातील भाजपा महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून सोंडे यांच्या नेतृत्वामुळे महिला आघाडी अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

